# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १७-०५-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दि १७ मे २००८ (कार्यक्रम पत्रिका क्र.१०) रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ४.४० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला उप आयुक्त (म) श्री.उध्दव घुगे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२२. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२३. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२४. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२५. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अब्दुल कदीर
२६. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
२७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२९. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३०. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३१. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३२. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान
३३. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३४. स.स.सौ.राऊत छाया विलास
३५. स.स.श्री.बैनाडे कवरसिंग किसनसिंग
३६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३८. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
३९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४०. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४२. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४४. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४६. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४८. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
४९. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५०. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५१. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५२. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५५. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५६. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
५७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६०. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६१. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६२. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६७. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
६९. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७०. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**विषय क्र.२३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत श्री.असीम गुप्ता हे पालिका आयुक्त म्हणून रूजू झाल्यापासून विविध विकासाची कामे व प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही प्रकल्प पूर्ण झालेले असून अनेक प्रकल्प पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. वृत्तपत्रातील बातम्यांवरून असे कळते की, मा.आयुक्त श्री.असीम गुप्ता यांची बदली झालेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रतिकुल परिस्थितीमध्ये त्यांनी आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला होता व विविध विकास कामांना चालना दिली. विशेषत: त्यांनी जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूज्जीवन अभियान अंतर्गत शहराचा २५ वर्षाचा विकास आराखडा तयार केला. शहर बस वाहतूक सुरू केली व ती अत्यंत चांगल्या पध्दतीने चालविली जात आहे. ई-टेंडरींगची सुरूवात केली. शहरातील ऐतिहासिक दरवाजांचे सौंदर्यीकरण, पुनरूज्जीवन केले. यासारखी अनेक विकासाची कामे व आणखी बरीच कामे जसे ई-फ्लोरींग,बीओटी तत्वावरील सिध्दार्थ उद्यान व महापौर बंगल्याजवळील प्रकल्प,वनस्पती उद्यान,रोज गार्डन,प्राणी संग्रहालयाचे स्थलांतर, आय.टी.पार्क, गरवारे स्टेडीयम परिसरातील अनेक प्रकल्प, शहरातील ड्रेनेज लाईन,जलवाहिन्या यांचा सर्व्हे करून नकाशे तयार करणे, समांतर जलवाहिनी प्रकल्प, डिफर्ड पेमेंटवरील रस्ते, विविध उड्डाण पुल ही कामे पूर्ण होणे बाकी आहे.

मा.आयुक्त,श्री.असीम गुप्ता यांनी प्रशासकीय कामकाजामध्ये सर्व पक्षाचे पदाधिकारी पालिका सदस्य,अधिकारी, कर्मचारी,पत्रकार,शासन आणि सामान्य जनतेमध्ये अत्यंत चांगल्या प्रकारे समन्वय साधला आहे. त्यांच्या सेवेची आणखी एक वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत आवश्यकता आहे.

श्री.असीमकुमार गुप्ता यांच्या कार्यकाळात औरंगाबाद शहराच्या विकासाच्या दृष्टीने अनेक निर्णय घेण्यात आले व त्या निर्णयांची अंमलबजावणी धडाडीने करण्यात आली. शहरातील समांतर जलवाहिनीचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून याबाबतची कार्यवाही मा.आयुक्तांच्या मार्फत करण्यात आलेली असल्याने सदरील प्रश्न संपूर्णपणे निकाली काढण्यासाठी त्यांची या महापालिकेस गरज आहे.

त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रगतीला आणि शहराच्या उन्नतीला दिशा मिळेल. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेत पुढील एक वर्षासाठी नियुक्ती कायम ठेवावी.

तरी त्यांची बदली रद्द करण्यात येवून त्यांना पुढील एक वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत मुदतवाढ देण्यात यावी. याकरीता सर्वसाधारण सभेमध्ये सर्वपक्षीय एकमताने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड,श्री.कंवरसिंग बैनाडे,श्री.संतोष जेजुरकर,श्री.भाऊसाहेब वाघ,
सौ.लता दलाल,श्री.सतिष कटकटे,श्री.अनिल जैस्वाल,श्री.विजय खुडे,श्री.शशांक विसपूते,
श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.रशिद खान (मामु),
श्री.वसंत नरवडे पाटील,श्री.कैसर खान,श्रीमती नजमा युनुस कुरैशी,
श्री.हिम्मतराव दाभाडे,श्रीमती मोमीन सफिया फिरदोस

अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी,श्री.भगवान (बापू)घडमोडे,श्री.प्रशांत देसरडा,
श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.महेश माळवतकर,श्री.सिताराम सुरे,श्री.नारायण कुचे,
श्री.अशरफ मोतीवाला,श्री.जावेद कुरैशी,श्री.सलीम खान,श्री.सय्यद खुसरो,
श्री.संजय जगताप,श्री.किशोर तुलसीबागवाले,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

**<u>संवाद :</u>**

श्री.किशनचंद तनवाणी :महापालिकेचे आयुक्त श्री.असिमकुमार गुप्ता यांची बदली झाल्याचे सर्वच वृत्तपत्रात आज छापून आले सत्य परीस्थिती काय आहे याचा प्रशासनाकडून खुलासा घ्यावा.

मा.महापौर :मा.आयुक्तांच्या बदली संदर्भात विचारलेल्या प्रश्नाचा प्रशासनाने खुलासा करावा.

उप आयुक्त (म) :मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांचे बदली संदर्भात महापालिकेला शासनाकडून अधिकृत आदेश प्राप्त नाही.

श्री.किशनचंद तनवाणी :वर्तमानपत्रात बदली झाल्या बाबत बातमी आली आहे त्यानूसार या सभागृहातील सर्वांच्या भावना लक्षात घेवून मी प्रस्ताव देत आहे मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांनी या महापालिकेत मोठमोठे उपक्रम हाती घेवून गेल्या तीन वर्षात चांगली कामे केली आणखी काही उपक्रम जसे शासनाने जकात रद्य करून उपकर लागू करणार आहे मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांनी त्या बाबतीत बैठका घेतल्या अभ्यास केला त्यासाठी आणखी एक वर्ष त्यांना या महापालिकेत आयुक्त म्हणून ठेवावे अशी शासनास आपण महापौर म्हणून या सभागृहाच्या वतीने शिफारस करू शकतो ती आपण करावी. तसा ठराव देत आहोत तो आपण मान्य करावा.

डॉ.भागवत कराड :आता जो ठराव ठेवला त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.अ.रशिद खान :मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांना आणखी एक वर्षासाठी ठेवण्याबाबत जो ठराव दिला त्यास माझे अनुमोदन आहे.

यावेळी तसा प्रस्ताव मा.महापौरांकडे दिला जातो.

श्री.कैलास गायकवाड :मा.आयुक्त यांचे सेवेचा कार्यकाळ तीन वर्षाचा झालेला असून आणखी एक वर्षासाठी त्यांना येथे सेवा देण्या बाबत जो प्रस्ताव दिला त्यास माझा विरोध आहे.

श्री.सलीम खान :मा.आयुक्त यांना एक वर्षासाठी या महापालिकेत ठेवण्याचा जो प्रस्ताव दिला त्यास मंजूरी द्यावी व तशी शासनाकडे शिफारस करावी. जर अधिकारी कायद्याचे पालन करीत असेल नोटीस देत असेल त्यामुळे जर कुणी विरोध करीत असेल तर याला अर्थ नाही.

श्री.संजय सिरसाट :मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांचे बदलीच्या संदर्भात वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. जवळपास २९ आयएएस अधिका-यांच्या बदल्या झालेल्या असून प्रशासनाकडे माहिती आली नसेल तो भाग वेगळा ही तहकूब सभा आहे. तहकूब सभेत हा विषय नियमानुसार

घेता येत नाही. दुपारी २.०० वाजता सभा आहे त्यात यावर चर्चा करू.

श्री.किशनचंद तनवाणी : या प्रस्तावावर झालेली चर्चा व हा प्रस्ताव दुपारच्या बैठकीत घ्यावा.

श्री.कैलास गायकवाड :मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांना या महापालिकेत तीन वर्ष पुर्ण झालेले आहे त्यांचा कार्यकाळ संपलेला असून त्यांचा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करू नये त्यास माझा विरोध आहे.

मा.महापौर :ही तहकूब सभा असून जी चर्चा झाली त्यांची नोंद घेतलेली असून या विषयावर ज्यांचा विरोध आहे तो नोंदवून घेतला आहे.

श्री.संजय जोशी : बरोबरच सहा.संचालक नगररचना या महापालिकेला नाही. ते सुध्दा मागविण्याबाबत सभागृहाने विचार करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :या सभागृहाने एक ठराव क्र.अधिकाऱ्यांच्या संदर्भाने घेतला होता तो निलंबीत झाला शासनाने आपणास तसे कळविले या सभागृहाचे जे काही मत असेल ते मा.महापौरांनी शासनाला कळवावे ही माझी विनंती आहे.

श्री.अ.रशिद खान :मा.आयुक्त श्री.असीमकुमार गुप्ता यांना या महापालिकेत आयुक्त म्हणून एक वर्षासाठी ठेवण्याचा दिलेला प्रस्ताव मंजूर करावा तशी शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

डॉ.भागवत कराड :दोन प्रस्ताव आलेले आहे दोन्हीतील मजकूर एकच आहे. मा.आयुक्त यांनी बदली झालेली आहे. एक वर्षासाठी ती बदली शासनाने स्थगित करावी असा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.मो.जावेद मो.इसाक:एक वर्षासाठी आयुक्त म्हणून श्री.गुप्ता साहेब यांना मुदत देण्याचा प्रस्ताव मंजूर करावा शासनाकडे तशी शिफारस करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव क्र.९३ पाठविले होते ते शासनाने निलंबन केले आहे ठरावाच्या अनुषंगाने मा.महापौरांनी महानगरपालिकेचे मत अभिवेदन पुन्हा एकदा शासनाला कळविण्यात यावे अशी विनंती.

श्री.अशरफ मोतीवाला :या महापालिकेत आयुक्त म्हणून श्री.गुप्ता साहेब यांना एक वर्ष ठेवण्याचा जो प्रस्ताव दिला तो मान्य करावा.

डॉ.भागवत कराड : स्व.राजीव गांधी यांचे पुतळयाचे उद्‌घाटनासाठी २१ तारखेला मा.मुख्यमंत्री येणार आहे. आपण व सर्व पदाधिकारी यांनी त्यांना तसे निवेदन देवून प्रत्यक्ष भेट घ्यावी व विनंती करावी.

मा.महापौर :महापालिकेचे आयुक्त श्री.असीम गुप्ता यांची नागपूर महापालिकेत नुकतीच बदली झाली असे समजले महापालिकेने या सभागृहाने बहुसंख्येने सर्वांनी मा.आयुक्त असीमकुमार गुप्ता यांनी बदली एक वर्षाकरीता थांबवावी व त्यांनी एक वर्ष या महापालिकेत काम करावे. तसा ठराव संगळयानी मिळून मांडलेला आहे. एकाचा विरोध नोंदवून बहुमताने हा ठराव मांडलेला आहे. म्हणून मा.आयुक्त श्री.असीम कुमार गुप्ता यांची या महापालिकेत एक वर्षासाठी नियुक्ती कायम ठेवावी म्हणून दिलेला प्रस्ताव मंजूर करण्यात येतो व शासनाकडे पाठवून तशी शिफारस करण्यात येईल. आताच स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी जी दुरूस्ती सुचवली आहे त्याप्रमाणे

शासनास देण्यात येईल. मा.मुख्यमंत्री या शहरात येत आहे माझेसह सर्व पदाधिकारी मिळून त्यांची भेट घेवून तसे निवेदन देवून विनंती केली जाईल. आताच स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी जी दुरूस्ती सुचवली आहे त्याप्रमाणे शासनास कळविले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेत श्री.असीम गुप्ता हे पालिका आयुक्त म्हणून रूजू झाल्यापासून विविध विकासाची कामे व प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही प्रकल्प पूर्ण झालेले असून अनेक प्रकल्प पुर्णत्वाच्या मार्गावर आहे,जसे औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रतिकुल परिस्थितीमध्ये त्यांनी आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला होता व विविध विकास कामांना चालना दिली. विशेषत: त्यांनी जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूज्जीवन अभियान अंतर्गत शहराचा २५ वर्षाचा आराखडा तयार केला. शहर बस वाहतूक सुरू केली व ती अत्यंत चांगल्या पध्दतीने चालविली जात आहे. ई-टेंडरींगची सुरूवात केली. शहरातील ऐतिहासिक दरवाजांचे सौंदर्यीकरण, पुनरूज्जीवन केले. यासारखी अनेक विकासाची कामे व आणखी बरीच कामे जसे ई-फ्लोरींग,बीओटी तत्वावरील सिध्दार्थ उद्यान व महापौर बंगल्याजवळील प्रकल्प,वनस्पती उद्यान,रोज गार्डन,प्राणी संग्रहालयाचे स्थलांतर,आय.टी.पार्क,गरवारे स्टेडीयम परिसरातील अनेक प्रकल्प, शहरातील ड्रेनेज लाईन,जलवाहिन्या यांचा सर्व्हे करून नकाशे तयार करणे, समांतर जलवाहिनी प्रकल्प, डिफर्ड पेमेंटवरील रस्ते, विविध उड्डाण पुल ही कामे पूर्ण होणे बाकी आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रगतीला आणि शहराच्या उन्नतीला दिशा मिळेल,याकरीता या सर्व बाबींचा विचार करून शासनाने त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेत श्री.असीम गुप्ता, आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद या पदावर पुढील एक वर्षासाठी नियुक्ती कायम ठेवण्यास व महाराष्ट्र शासनास तशी विनंती करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मो.जावेद मो.इसाक : हे शहर ४०० वर्षापूर्वीचे असून तेंव्हा पासून दररोज पिण्याचे पाणी दिले जात आहे तेच आज एक दिवसाआड करण्याची वेळ का आली. येत असलेले पाणी अर्धा तास सुध्दा येत नाही कमी दाबाने येते.

मा.महापौर :या विषयावर चर्चा होईल अगोदर विषयपत्रिका घेण्यात येत आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक :पिण्याच्या पाण्याचा विषय चर्चेला घ्यावा त्यानंतर विषय पत्रिका घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :शहराचा पाणीप्रश्न गंभीर आहे. प्रचंड ओरड नागरीकांची आहे त्या विभागाचे अधिकारी काम करण्यास सक्षम नसेल तर त्या पदावर सुध्दा दुसरे अधिकारी बदलून देण्याची गरज आहे. जेणे करून पाणी पुरवठा सुरळीत होईल.

श्री.सलीम खान : दोन वर्षापूर्वी (डॅम)धरणात पाणी कमी असतांना शहराला दररोज येत होते आज पाणी असूनही एक दिवसाआड पाणी का दिले जाते. असे असेल तर सहा महिण्याचीच पाणीपट्टी घ्यावी.

श्री.देसरडा प्रशांत :अधिकारी सक्षमपणे काम करीत नसेल तर त्यांची त्वरीत बदली करावी.

श्री.अ.रशीद खान :पाणी सोडणारे लाईनमन यांना मोबाईल देणार होते दिले ते देण्यात यावे जेणे करून त्यांचेशी संपर्क करता येईल. व २ तास पाणी द्या.

सौ.खान अजरा जबीन :माझे वार्डासह बाजूच्या भागात ५० वर्षापूर्वीची जुन्या पाईपलाईन वरून पाणी दिले जाते. सदर लाईनवर अनेक ठिकाणी लिकीजेस आहे पुर्वीपेक्षा लोकसंख्या वाढवूनही आजही पुर्वी एवढेच पाणी दिले जाते. मोठी पाईप लाईन टाकावी प्रेशरने पाणी यावे.

सौ.मोमीन सफिया फिरदोस : ८-१० वर्षापासून माझे वार्डात पाण्याची सतत टंचाई आहे. बाजूच्या कांचनवाडी,नक्षत्रवाडी भागात डायरेक मोठया पाईपलाईनद्वारे पाणी दिले जाते. या संदर्भात मी अनेक वेळा मा.आयुक्त यांना पत्र दिले माझ्या भागात गरीब लोक जास्त असतात त्या भागात जाणूनबूजून पाणी कमी दिले जाते. संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही व्हावी.

कार्य.अभियंता(पापू) :जी परीस्थिती आहे त्यात हळूहळू सुधारणा होत आहे जो पर्यंत बदल होत नाही तोपर्यंत ही परीस्थिती राहील. थोडक्यात असे की १९९१ साठी शहराची लोकसंख्या ५.७३ लक्ष होती आज ११.५० ते १२ लक्ष लोकसंख्या आहे येणारे पाणी तेवढेच आहे. सर्वांना सारख्याच प्रमाणात पाणी देण्याची मागणी बऱ्याच दिवसापासून होती. ज्या भागात पाणी जात नाही त्या भागात पाणी जाण्याची शक्यता होती. व सर्व भागात प्रेशरने समान पाणी वाटप करण्यासाठी एक दिवसाआड पाणी देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. काही क्रॉस कनेक्शन करणे बाकी आहे. जेथे अल्टरनेट पुरवठा आहे तेथे पाणी व्यवस्थीत मिळते आहे. जेथे दररोज पाणी येते तेथे अडचणी येत आहे. १०-१२ ठिकाणी काम चालू आहे ते लवकर दुरूस्त करून सर्वांना समान व वेळेवर पाणी देण्याचा प्रयत्न राहील.

श्री.अ.रशिद खान :मा.महापौर,मा.आयुक्त यांचे सांगण्यावरून एक दिवसाआड पाणी करून काही वार्डातील पाणी कमी केले पाणीपट्टी वर्षाची घेत आहे. पुर्वी दररोज पाणी येत होते काय चूक झाली एक दिवसाआड केले. सदस्यांचे मत न घेता मा.महापौर मा.आयुक्त यांचे सांगण्यावरून बदल होत असेल तर कितपत योग्य वाटते.

श्री.मो.जावेद मो.इसाक :दररोज येणारे पाणी एक दिवसाआड करण्या अगोदर त्या-त्या सदस्यांना माहिती द्यायला पाहिजे वार्डातील जनतेला कळविता आले असते. दररोज येणारे पाणी एकदम एक दिवसाआड करणे म्हणजे ही दादागिरी होते आहे. उद्यापासून दररोज पाणी द्यावे नसता सभेचे पुढील कामकाज आम्ही होवू देणार नाही.

श्री.देसरडा प्रशांत :शहराची लोकसंख्या वाढली दररोज पाणी देवूच शकत नाही.

याच वेळी मा.महापौर डायससमोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

श्री.भगवान घडमोडे :एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय सर्व पदाधिकारी यांनी मिळून घेतला आहे ज्यांना पाणी मिळत नव्हते त्यांनाही मिळत आहे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक: १५ वर्षापासून शहराची लोकसंख्या वाढली आहे. तेंव्हा पासून केले नाही आताच एक दिवसाआड पाणी करण्याची का गरज पडली. जे दररोज पाणी दिले जात होते त्या लोकांवर अन्याय करीत आहोत. उद्यापासून दररोज पाणी देण्याचे आपण आदेश करावेत.

श्री.रेणुकादास वैद्य :किती भागात एक दिवसाआड व किती भागात दररोज पाणी दिले जाते.

मा.महापौर :सर्व नागरीक समान आहे सर्वांना पाणी मिळावे असी आपली सर्वांची भावना आहे. ज्या भागात पाणी कमी येते तशा तक्रारी प्राप्त होतात त्याची पाणीपुरवठा अधिकारी यांनी दखल घ्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक :दररोज पाणी पुरवठा करण्याचे आदेशीत करावे. नसता सभेचे कामकाज होवू देणार नाही.

याच वेळी स.सदस्य श्री.मो.जावेद मो.इसाक यांनी मा.महापौर यांचे डायस वरील राजदंड धरून ओडण्याचा प्रयत्न करीत होते व त्यांचे सह इतर काही स.सदस्य मोठमोठयाने बोलत होते.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.सय्यद खुसरो :एक दिवसाआड किती वार्डात पाणी देत आहोत.

मा.महापौर :डायस समोर येवून कुणीही मोठमोठयाने बोलू नये आपआपल्या जागेवरून बोलावे. ज्या भागातील पाणी पुरवठा विस्कळीत झाला तो संबंधीत अधिकारी यांनी सुरळीत करावा सर्वांना पाणी पुरेसे व योग्य दाबाने मिळेल याची काळजी घ्यावी. ज्या लाईनमनकडे मोबाईल नाही त्यांना मोबाईल देण्यात यावे. ज्या भागात पाणी येणार नाही त्या संदर्भात संबंधीत अधिकारी यांना सुचना दिल्या आहे. आता सर्वांनी जागेवर बसावे.

मा.महापौर वेळोवेळी सूचना देवूनही स.सदस्य आपल्या जागेवरून बोलत नव्हते.

**<u>विषय क्र.२१८ :</u>**

दिनांक १९.०३.२००८ (का.प.क्र.०६) व दिनांक १९.०३.२००८ (का.प.क्र.०७) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.कैलास गायकवाड : विषय क्रमांक १९६-अ मध्ये आक्षेप आहेत. जिम्नॅशियम हॉल ऐवजी प्रतापगडनगर येथे मोकळ्या जागेत संरक्षक भिंत बांधणे व लेखाशिर्ष बदलणे व प्रत्यक्षात जागेत झालेल्या बदलास मान्यता द्यावी. अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १९.०३.२००८ (का.प.क्र.०६) इतिवृत्तातील विषय क्रमांक १९६-अ मध्ये जिम्नॅशियम हॉल ऐवजी प्रतापगडनगर येथे मोकळ्या जागेत संरक्षक भिंत बांधणे व लेखाशिर्ष बदलणे व प्रत्यक्षात जागेत झालेल्या बदलास मान्यता देण्यांत येते, या दुरूस्तीसह

दिनांक १९.०३.२००८ (का.प.क्र.०६) व दिनांक १९.०३.२००८ (का.प.क्र.०७) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.२१९ :**

आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करांवर विलंब शुल्क आकारणी करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेने दिनांक १६.०२.२००८ रोजी ठराव (विषय क्र.१३०) पारित केलेला आहे. त्यानुसार दिनांक ०१.०४.२००८ पासून १२ टक्के विलंब शुल्क आकारण्यात येत आहे. तथापी सर्वसामान्य मालमत्ता धारकास थकीत रकमेचा कर भरणा करणेस संधी मिळावी म्हणून मा.महापौर यांनी त्यांच्या दालनात बैठक घेवून अभय योजना लागु करण्याबाबत दि.०७.०५.२००८ च्या पत्रान्वये आदेशित केले आहे. त्यानुषंगाने विलंब शुल्काची आकारणी दि.०१.०४.२००८ पासून न करता दि.०१.०८.२००८ पासून करणे बाबत प्रस्ताव सादर करणेत येत आहे. यापूर्वी दिनांक ०१.०४.२००८ पासून वसूल करणेत आलेला विलंब शुल्क पुढील वर्षाकरिताच्या मालमत्ता/पाणीपट्टी करात समायोजीत करणेत येईल.

करिता सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

याचवेळी सभागृहात हा विषय मंजूर करावा अशी मोठमोठयाने सदस्य मागणी करतात.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करांवर विलंब शुल्क आकारणी दि.०१.०४.२००८ पासून न करता दि.०१.०८.२००८ पासून करणेस व यापूर्वी दिनांक ०१.०४.२००८ पासून वसूल करणेत आलेला विलंब शुल्क पुढील वर्षाकरिताच्या मालमत्ता/पाणीपट्टी करात समायोजीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.सुराणानगर भागात सेव्हन हिल परिसराच्या उंच भागावरील पावसाळ्यात पावसाचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात सुराणानगर या सखल भागात वाहत येते. पावसाचे सांडपाणी सुराणानगर भागातील नागरीकांच्या घरात शिरून जिवीत व आर्थिक हाणी होण्याची दाट शक्यता असल्याने सदर भागाची मा.महापौर,स.नगर सेवक यांच्यासह संयुक्त स्थळ पाहणी झाली असता सदर ठिकाणी पावसाचे सांडपाणी वाहून जाण्यासाठी रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधणे अनिवार्य असल्याचे निदर्शनास आल्याने वार्ड क्र.५०,मो.सुराणानगर भागात रस्त्यालगत आर.सी.सी.सरफेस गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अ.प.रक्कम रू.२९,९०,०००/- होत आहे. सदरील काम वर्ष २००८-०९ अर्थसंकल्पमधील पान क्र.डब्ल्यु-४०,अ.क्र.१९ वरील ३० लक्ष तरतूद शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्ष मधून प्रस्तावित आहे. रक्कम रू.२९,९०,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : हा विषय पुढील बैठकीत घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव पूढील बैठकीत घेण्यास मान्यता देण्यांत आली.

याच वेळी सभागृहात अनेक सदस्य सर्व विषय मंजूर करण्याची मागणी करीत होते मोठमोठयाने बोलत होते काही स्पष्ट ऐकू येत नव्हते.

**विषय क्र.२२१ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हैद्राबाद मुक्ती संग्राम स्वातंत्र सैनिक गृह निर्माण संस्था (म) गट नंबर ७० मौजे पडेगांव यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक ७८१/१७/०७-०८ दिनांक २०.१२.२००७ द्वारे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असून कार्यालयीन पत्र क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/संसनर/३५९/२००८ दिनांक ०५.०३.२००८ नुसार खालीलप्रमाणे रक्कम भरणा करण्यासाठी कळविलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | शहर विकास निधी रक्कम रूपये | - | ५३,१४५/- |
| ०२. | जमीन विकास शुल्क रक्कम रूपये | - | ५३,९३०/- |
| ०३. | विकास खर्च रक्कम रूपये | - | ३,७७,५१०/- |
| ०४. | सामासिक अंतरातील बांधकामा देण्यात आलेली सुट बाबत प्रिमियम | - | ३९,६६०/- |

तथापी,अध्यक्ष हैद्राबाद मुक्ती संग्राम स्वांतत्र सैनिक गृह निर्माण संस्था यांनी दिनांक १५.०४.२००८ रोजी लेखी पत्र देवून विनंती केली आहे की, सदर संस्था ही वयोवृध्द मानधनधारक स्वातंत्र सैनिकाची असून त्यांना औरंगाबाद शहरात स्वत:चे घर नाही. स्वातंत्र्य सैनिक यांनी देशाकरीता केलेली निस्वार्थ सेवा व त्याग याची दखल घेवून उपरोक्त प्रमाणे आकारण्यात आलेली रक्कम १००% माफ करावी.

करीता हैद्राबाद मुक्ती संग्राम स्वातंत्र सैनिक गृह निर्माण संस्था (म) गट नंबर ७० मौजे पडेगांव या संस्थेस वरीलप्रमाणे आकारण्यात आलेले शुल्क माफी बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे मान्यतेस्तव व विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

मा.महापौर : २५ टक्के सुट मान्य करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हैद्राबाद मुक्ती संग्राम स्वातंत्र सैनिक गृह निर्माण संस्था (म) गट नंबर ७० मौजे पडेगांव या स्वातंत्र सैनिक गृह निर्माण संस्थेस बांधकाम परवानगी करीता अ.क्र.१ ते ४ प्रमाणे आकारण्यात आलेले शुल्कामध्ये २५ टक्के सुट देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

याच वेळी मा.महापौर यांनी वेळोवेळी स.सदस्यांना जागेवर बसण्याच्या सूचना देवून ही स.सदस्य जागेवरून बोलत नव्हते. मोठमोठयाने गोंधळ चालू होता काहीही ऐकू येत नव्हते.

मा.महापौर : विषयपत्रिकेवरील व ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येते.

**विषय क्र.२२२ :**

आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत पाळीव श्वानांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (क) अंतर्गत वार्षिक श्वान परवाना (१ एप्रिल ते ३१ मार्च) व्दारे श्वान कर लावण्यात आलेला आहे. सद्याचे दर हे १९९४ पासून लागू आहेत.

करीता खाली दर्शविल्याप्रमाणे श्वान परवाना व नुतनीकरण फि मध्ये वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर दर प्रस्तावास अंतिम मान्यता मिळाल्यापासून आमलात येईल.

| श्वान परवाना तपशिल | सद्यस्थित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १. नविन परवाना फि (वार्षिक) | ४५.०० | ५००.०० |
| २. श्वान परवाना फि नुतणीकरण (वार्षिक) | ३०.०० | २५०.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. नुतणीकरण विलंब अतिरीक्त कर | | |
| अ. ३० दिवसांच्या आत | निरंक | निरंक |
| ब.३१ ते ६० दिवस (१०%) | ०३.०० | ५०.०० |
| क.६० दिवसानंतर (१००%) | ३०.०० | २५०.०० |
| ४. विना परवाना श्वान पकडूनआणल्यास श्वान परवाना देवून परत करण्याचे खर्च | १००.०० | ५००.०० |

(परवाना फि अतिरीक्त राहील.) वरील दर्शविल्याप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत पाळीव श्वानांना खाली दर्शविल्याप्रमाणे श्वान परवाना व नुतनीकरण फि मध्ये वाढ करण्यास व सदर दर प्रस्तावास अंतिम मान्यता मिळाल्यापासून आमलात आणणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| श्वान परवाना तपशिल | सद्यस्थित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १. नविन परवाना फि (वार्षिक) | ४५.०० | ५००.०० |
| २. श्वान परवाना फि नुतणीकरण (वार्षिक) | ३०.०० | २५०.०० |
| ३. नुतणीकरण विलंब अतिरीक्त कर | | |
| अ. ३० दिवसांच्या आत | निरंक | निरंक |
| ब.३१ ते ६० दिवस (१०%) | ०३.०० | ५०.०० |
| क.६० दिवसानंतर (१००%) | ३०.०० | २५०.०० |
| ४. विना परवाना श्वान पकडूनआणल्यास श्वान परवाना देवून परत करण्याचे खर्च | १००.०० | ५००.०० |

(परवाना फि अतिरीक्त राहील.) वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र.२२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडीरस्ता तयार करणे या कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२७ | जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडी रस्ता तयार करणे-५,९५,५०६/- | महानगरपालिका कार्यालयासमोरील अतिक्रमण काढलेल्या २४ मी. रूंद रस्त्याचे खडीकरण करणे फुटपाथ बांधणे-५,९५,५०६/- W |

सुचक : श्री.संजय जोशी अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडीरस्ता तयार करणे या कामासाठी अर्थसंकल्प तरतूदीत खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२७ | जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडी रस्ता तयार करणे-५,९५,५०६/- | महानगरपालिका कार्यालयासमोरील अतिक्रमण काढलेल्या २४ मी. रूंद रस्त्याचे खडीकरण करणे फुटपाथ बांधणे-५,९५,५०६/- W |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,पोलीस विभागातर्फे शहर पोलीस कल्याण निधी निमित्त दि.१७.०५.२००८ रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर हास्य संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. सदरील कार्यक्रमासाठी औरंगाबाद शहर पोलीस कल्याण निधी करीता महापालिकेतर्फे रक्कम रू.१.०० लक्ष आर्थिक मदत देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,पोलीस विभागातर्फे शहर पोलीस कल्याण निधी निमित्त आयोजीत दि.१७.०५.२००८ रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळावरील हास्य संगीत रजनीच्या कार्यक्रमाकरीता महापालिकेतर्फे रक्कम रू.१.०० लक्ष आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्र.२२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, टाऊन हॉल येथील चौकास मलिक अंबर चौक नांव देण्यांत आले होते. त्याच चौकाच्या वरून नविन उड्डाण पुल बांधण्यात आलेले आहे. यामूळे या पुलास मलिक अंबर उड्डाणपुल असे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जगताप

अनुमोदक : १.श्री.अ.साजेद अ.सत्तार, २.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन,
३.श्री.अब्दुल रशिद खॉन (मामु) हमीद खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल येथे बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलास मलिक अंबर उड्डाणपुल असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रमेश देव प्रॉडक्शन,मुंबई तर्फे नेहमीच चित्रपट निर्मिती करतांना मनोरंजना बरोबरच सामाजिक जबाबदारी वय भारतीय मुल्यांची जपणूक करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात येते. भारतीय इतिहासाचे सोनेरी पान असलेले आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या ओजस्वी जीवनावर आधारित वासुदेव बळवंत फडके हा चित्रपट निर्माण करण्यात आलेला आहे. सदरील चित्रपट देश व विदेशात सादर करण्याच्या दृष्टीकोनातून सदरील चित्रपटाचे हिंदी व इंग्रजी भाषेत डबींग करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. सदरील चित्रपटाच्या निर्मीतीसाठी मुंबई, पुणे,पिंपरी चिंचवड,कोल्हापुर महानगरपालिकेने आर्थिक मदत केलेली आहे. औरंगाबाद येथे संपन्न झ ाालेल्या ४५ व्या मराठी चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्यात सदरील चित्रपटास राज्य सरकारचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळालेला आहे.

त्यानुषंगाने देशातील तसेच परदेशातील इतर भाषिकांना आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची महती कळावी या उद्देशाने या चित्रपटाचे डबींगसाठी महानगरपालिकेतर्फे र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख फक्त) आर्थिक मदत देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर,श्री.पुनमचंद बमणे
अनुमोदक : सौ.लता दलाल,श्री.महेश माळवतकर,सौ.दिपाली पाटील,सौ.पार्वताबाई वाघमारे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके या चित्रपटाचे डबींगसाठी महानगरपालिकेतर्फे र.रू.२,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख फक्त) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्रा बाहेरील केरळ राज्यातील शैक्षणिक सुविधा, गुणवत्ता,सर्व शिक्षा अभियानातील उपक्रम,स्टाफिंग पेटर्न,भौतिक सुविधा,१०० टक्के साक्षरता, बालकामगार योजना,आर्थिक तरतूद,विद्यार्थी पालक व प्रशासन यांचा समन्वय तसेच शिक्षण मंडळाची रचना व कार्यवाही इत्यादी बद्दल सुक्ष्म निरीक्षणात्मक अभ्यास दौरा करण्यासाठी महानगरपालिका माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांना व सन्मानीय सदस्यांना आर्थिक तरतूदीसह परवानगी द्यावी ही विनंती.
सुचक : सौ.सरिता अशोक ससाणे
अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा,सौ.अंजली कोंडेकर,श्रीमती अजरा जबीन,श्री.नासेर नाहदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्रा बाहेरील केरळ राज्यातील शैक्षणिक सुविधा, गुणवत्ता,सर्व शिक्षा अभियानातील उपक्रम,स्टाफिंग पेटर्न,भौतिक सुविधा,१०० टक्के साक्षरता, बालकामगार योजना,आर्थिक तरतूद,विद्यार्थी पालक व प्रशासन यांचा समन्वय तसेच शिक्षण मंडळाची रचना व कार्यवाही इत्यादी बद्दल सुक्ष्म निरीक्षणात्मक अभ्यास दौरा करण्यासाठी महानगरपालिका माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांना व सन्मानीय सदस्यांना आर्थिक तरतूदीसह परवानगी देण्यांस मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२ अंतर्गत मौजे हर्सूल येथील सर्वे नं.१५४,१५५ या परिसरात गोकुळनगर व वसंतनगर या सुमारे ५०० ते ६०० घरांच्या वसाहती असून या परिसरात वास्तव्य करणाऱ्या नागरीकांना रस्ता उपलब्ध नसल्यामूळे नाईलाजास्तव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेमधून ये-जा करावी लागते. काही वेळेस या वरून बरेच वाद होतात भविष्यात या ठिकाणी काही अनुचीत घटना घडल्यास अशावेळी सदरील ठिकाणी जाणे प्रशासनास अडचणीचे ठरू शकते.

त्यामूळे या भागातील नागरीकांना २५ फुट रूंदीचा पोच रस्ता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्या करीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्वे नं.१४ मधून ५०० चौ.मी.आणि सर्वे नं.१५६ मधील साधारणत: १५० चौ.मी.एवढी खाजगी जागा महानगरपालिकेतर्फे संपादीत केल्यास या संपूर्ण वसाहतींचा पोच रस्त्याचा प्रश्न निकाली निघु शकतो. करीता उपरोक्तप्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री.सीताराम इसराम सुरे,श्री.संतोष खेंडके,श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
अनुमोदक : श्री.सतिष कटकटे,श्री.रविकांत गवळी,श्री.मो.जावेद मो.इसाक

(का.प.क्र. १०)

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२ अंतर्गत मौजे हर्सूल येथील सर्वे नं.१५४,१५५ या परिसरात गोकुळनगर व वसंतनगर या भागातील नागरीकांना २५ फुट रूंदीचा पोच रस्ता उपलब्ध करून देणेस व त्या करीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्वे नं.१४ मधून ५०० चौ.मी.आणि सर्वे नं.१५६ मधील साधारणत: १५० चौ.मी.एवढी खाजगी जागा महानगरपालिकेतर्फे संपादीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र.२२९ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरात आय.सी.सी.(Industrial Convention Centre) उभारणी करणे संदर्भात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्राथमिक चर्चा झाली आहे. अशा प्रकारचे केंद्र स्थापीत झाल्यास शहराच्या औद्योगीक विकासास चालना मिळेल.

सदर आय.सी.सी. शहराच्या विकासाच्या दृष्टीने, औद्योगिक विकासावर चर्चा,विचारविनिमय इत्यादी करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

सदरचे केंद्र औरंगाबादेत स्थापित करण्यासाठी एम.आय.डी.सी.चिकलठाणा परिसरात जागा उपलब्ध करून देण्याचे प्राथमिक चर्चेत एम.आय.डी.सी.च्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. सदरचे केंद्र स्थापीत करण्यासाठी पूढील अटी/शर्तींचा समावेश असेल.

०१. सदरचे केंद्र स्थापीत होण्यासाठी एम.आय.डी.सी.ने जागा उपलब्ध करून द्यावी.
०२. महानगरपालिकेने या केंद्राच्या मालमत्ता करात सूट द्यावी.
०३. यासाठी लागणारा पाणी पुरवठा महापालिकेने घरगुती वापराच्या दराने करावा.
०४. एस.पी.व्ही.मध्ये महानगरपालिकेचा ५०% समभाग (शेअर) असावा.

सदरचे केंद्र स्थापीत करण्यासाठी तूर्त महानगरपालिकेस आर्थिक योगदान देण्याची आवश्यकता नाही. शासनाकडून प्रस्तावास मान्यता मिळाल्यास व आर्थिक मदतची गरज भासल्यास मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

तरी सदरचे Industrial Convention Centre स्थापीत करणेचा आणि प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर पूढील कार्यालयीन कार्यवाही उदा.Memorandum of understanding (MOU) इत्यादी करण्याकरीता आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेचा प्रस्ताव उपरोक्त अटीशर्तीनुसार मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात आय.सी.सी. (Industrial Convention Centre) उभारणी करणेस व सदरचे केंद्र औरंगाबादेत स्थापित करण्यासाठी एम.आय.डी.सी. चिकलठाणा परिसरात जागा उपलब्ध करून देणार असल्यामूळे, सदरचे केंद्र स्थापीत करण्यासाठी पूढील अटी/शर्ती नुसार मान्यता देण्यांत येते.

०१. सदरचे केंद्र स्थापीत होण्यासाठी एम.आय.डी.सी.ने जागा उपलब्ध करून द्यावी.
०२. महानगरपालिकेने या केंद्राच्या मालमत्ता करात सूट द्यावी.
०३. यासाठी लागणारा पाणी पुरवठा महापालिकेने घरगुती वापराच्या दराने करावा.
०४. एस.पी.व्ही.मध्ये महानगरपालिकेचा ५०% समभाग (शेअर) असावा.

सदरचे केंद्र स्थापीत करण्यासाठी तूर्त महानगरपालिकेस आर्थिक योगदान देण्याची आवश्यकता नाही. करीता पूढील कार्यालयीन कार्यवाही उदा.Memorandum of

understanding (MOU) इत्यादी करण्याकरीता आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने कैलासनगर येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनी दिनांक १६.०४.१९९७ रोजी सुरू केली. प्रत्यक्षात ०२.१०.२००५ पासून अंत्यसंस्कारासाठी विद्युत दाहिनीचा प्रभावीपणे वापर सुरू झाला आहे. विद्युत दाहिनीच्या वापराबाबत विविध स्तरावरून प्रबोधन झाल्याने विद्युत दाहिनीचा वापर करण्याबाबत नागरिकांचा कल वाढला आहे. मध्यंतरी विद्युत दाहिनीतील शवदहनामुळे आसपासच्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याच्या तक्रारी नागरिक/समाजसेवी संस्थांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे विद्युत दाहिनी बंद ठेवून, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने विद्युत शवदाहिनीची तज्ञांमार्फत तपासणी करण्यात येऊन दुरूस्तीसाठी रूपये ७.५० लक्ष खर्च अपेक्षीत असल्याचे दिसून आले.

विद्युत दाहिनीचा वापर करतांना विद्युत दाहिनी २४ तास सुरू ठेवावी लागते,त्यामुळे विजेचे बिल प्रचंड येते. सद्यस्थितीत विद्युत दाहिनीचा वापर केला असता, विज बिलापोटी साधारणत: दरमहा रूपये ७५,०००/- म्हणजेच वार्षीक रूपये ९,००,०००/- खर्च येतो. तसेच विद्युत दाहिनी चालविण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्याचे वेतन, विद्युत दाहिनीचे देखभाल दुरूस्तीचा वार्षीक खर्च इत्यादी पाहता पर्याय म्हणून विद्युत दाहिनीचे रूपांतर गॅस दाहिनी मध्ये करण्याचे प्रस्तावीत आहे.

विद्युत दाहिनीचे एल.पी.जी. गॅस शवदाहिनी मध्ये रूपांतर करण्याचे कामात अग्रेसर असलेल्या चिरंतन उद्योग, पुणे यांचे कडून माहिती प्राप्त केली असता, विद्युत दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करण्यासाठी रूपये २२,७४,०००/- खर्च अपेक्षीत आहे. या दरपत्रकाच्या आधारभूत किंमतीनुसार विद्युत दाहिनीचे एल.पी.जी. गॅस शवदाहिनी मध्ये रूपांतर करणे, दहा वर्षे शवदाहिनीची देखभाल करणे, शवदाहिनी चालविणे, गॅस पुरवठा, कर्मचारी इत्यादीसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

१. विद्युत दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करणे. :- २२,७४,०००/-

२. दहा वर्षासाठी गॅसचा खर्च :- ६,००,०००/-

(एक शव दहनासाठी साधारण १६ कि.ग्र.गॅस प्रमाणे सहा शव दहनासाठी ९६ कि.ग्र.गॅस म्हणजेच १९ कि.ग्र. चे पाच सिलेंडर)

- एक सिलेंडरसाठी रूपये १०००/- प्रमाणे वर्षाकाठी ६००००/- खर्च
- दहा वर्षासाठी रूपये ६,००,०००/- खर्च

(यात भाववाढ धरलेली नाही)

३. भविष्यात अंदाजे प्रतिमाह २५ शव दहनाचा खर्च (गॅसची दरवाढ न धरता) :- ३०,००,०००/-

४. शवदाहिनीची देखभाल करणे,शवदाहिनी चालविणे यासाठी खाजगी एजन्सीला:- ३६,२२,४३०/-

प्रतिमाह २४,०००/- प्रमाणे (दरवर्षी ५%वाढ नुसार) दहावर्षाचा खर्च

**एकुण :- ८८,९७,४३०/-**

**म्हणजे दहा वर्षासाठीचा अंदाजे खर्च रूपये :- ९०,००,०००/-**

**प्रति वर्ष अंदाजे खर्च :- ९,००,०००/-**

तसेच सध्या कार्यरत विद्युत दाहिनी दुरूस्तीसह दहा वर्षासाठीचा खर्च खालील प्रमाणे.

१. विद्युत दाहिनीच्या विज बिलापोटी साधारणपणे दरमहा खर्च रूपये ७५,०००/-:- ९०,००,०००/- येतो. या प्रमाणे दहा वर्षाचा खर्च
(विजेची दरवाढ धरलेली नाही)

२. दाहिनीच्या चालविण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्याचे मासीक वेतन रूपये ८०००/-:- ९,६०,०००/- प्रमाणे दहा वर्षाचे वेतन

३. वार्षीक देखभाल दुरूस्ती (स्थापत्य+विद्युत)साधारण रूपये एक लक्ष प्रमाणे :- १०,००,०००/- दहा वर्षाचे

**एकुण :- १,०९,६०,०००/-**

**दहा वर्षासाठीचा अंदाजे खर्च :- १,१०,००,०००/-**

**शिवाय उक्त नमुद केल्याप्रमाणे सध्या विद्युत दाहिनी दुरूस्तीचा खर्च :- ७,५०,०००/-**

**एकुण :- १,१७,५०,०००/-**

उक्त प्रमाणे तुलनात्मक तक्त्यानुसार ठरावीक रक्कम देऊन खाजगी संस्थेमार्फत विद्युत दाहिनीचे गॅस शवदाहिनीमध्ये रूपांतर करणे, शव दाहिनी चालविणे,भविष्यात शवदाहिनीचा वापर वाढेल ही बाब विचारात घेऊन प्रतीमाह २५ शव दहन होतील असे गृहीत धरून त्यानुसार होणारा खर्च व खाजगी संस्थेस द्यावयाचे मासीक शुल्काच्या रक्कमेसह पुढील दहा वर्षांसाठी खर्च काढला असता गॅस शवदाहिनीचा वापर विद्युत दाहिनीपेक्षा कमी खर्चाचा होणारा असून, आर्थिक दृष्टया परवडणारा आहे. तसेच शवदाहिनी खाजगी संस्था/एजन्सी मार्फत मासीक तत्वावर चालविण्यास देखभाल दुरूस्ती बाबत येणाऱ्या तक्रारींना वाव मिळणार नाही.

वरील प्रमाणे विद्युत शवदाहिनीचे एल.पी.जी. शवदाहिनीत रूपांतर करणे, प्रत्येकी १९ कि.ग्र. वजनाचे एल.पी.जी. गॅस सिलेंडर्स खरेदी करणे व अनामत रक्कम भरणे इत्यादीसाठी रूपये २५.०० लक्षची तरतूद करावी लागणार असून, शवदाहिनी मासीक तत्वावर चालविण्यास देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करावी लागणार आहे.

करीता विद्युत शवदाहिनीचे एल.पी.जी. शव दाहिनीत रूपांतर करणे, शवदाहिनी मासीक तत्वावर चालविण्यास देणे या कामांसाठी निविदा मागविणे व प्रत्येकी १९ कि.ग्र. वजनाचे एल.पी.जी. गॅस सिलेंडर्स खरेदी करणे व अनामत रक्कम भरणे इत्यादीसाठी रूपये २५.०० लक्षची तरतूद करणेसाठी चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कैलासनगर येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत शवदाहिनीचे एल.पी.जी. शव दाहिनीत रूपांतर करणे, शवदाहिनी मासीक तत्वावर चालविण्यास देणे या कामांसाठी निविदा मागविणे व प्रत्येकी १९ कि.ग्र. वजनाचे एल.पी.जी. गॅस सिलेंडर्स खरेदी करणे व अनामत रक्कम भरणे इत्यादीसाठी रूपये २५.०० लक्षची तरतूद करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२३२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे निर्णयाच्या कार्यालयीन आदेश क्र.पदस्थापना-१३०८/प्र.क्र.१०१/०८/सेवा-२, मंत्रालय, मुंबई-३२ नुसार डॉ.एस.जी.देवगांवकर, बधिरीकरण तज्ञ, सा.रू.नाशिक यांना उपसंचालक पदी श्रेणी अवनत करून यांची वैद्यकीय अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर पदस्थापना करण्यात आली आहे.

करीता डॉ.एस.जी.देवगांवकर, यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.७/४/२००८ रोजी मध्यान्हापूर्व आरोग्य वैद्यकीय अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.एस.जी.देवगांवकर, हे औरंगाबाद महानगरपालिकेत दि.७/४/२००८ रोजी मध्यान्हापूर्व आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर रूजू झाले असून ते रूजू झाल्यापासून प्रास्तावित केल्याप्रमाणे प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे आदेश क्र. औमपा-११०७/११८०/प्र.क्र.३९९/०८/नवि-२४ मंत्रालय, मुंबई दि.१४/३/२००८ नुसार श्री.खा.बी.अरब, कक्ष अधिकारी,(वेतनश्रेणी रू.८०००-१३५०० गट-अ) महाराष्ट्र राज्य हज समिती यांची कर निर्धारक व कर संकलक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आली आहे.

करीता श्री.खा.बी.अरब यांची औरंगाबाद महानगरपालिकेत रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.१८/३/२००८ रोजी मध्यान्हापूर्व कर निर्धारक व कर संकलक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.खा.बी.अरब यांची औरंगाबाद महानगरपालिकेत दि.१८/३/२००८ रोजी मध्यान्हापूर्व कर निर्धारक व कर संकलक, या पदावर रूजू झालेले असून रूजू झालेल्या तारखेपासून प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३५ येथील मेडीकल क्वार्टरच्या समोर कोहेनुर कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुला खुली जागेमध्ये उद्यान विकसीत होणार आहे त्या उद्यानाची भिंती व अन्य कामे होत आहे. सदरील उद्यानामुळे पाणचक्की परिसराची शोभा वाढेल या उद्यानास ‘‘असीमकुमार गुप्ता उद्यान’’ असे नामकरण करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अब्दुल रशीद खान (मामू) अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ येथील मेडीकल क्वार्टरच्या समोर कोहेनुर कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुला खुल्या जागेमध्ये विकसीत होत असलेल्या उद्यानास ‘‘असीमकुमार गुप्ता उद्यान’’ असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-९ एल सेक्टर, हडको औरंगाबाद येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रा लगतच्या प्लॉट क्र.१११ ए-१ सेक्टर एल मधील ५८ स्के.मीटरच्या

**(का.प.क्र. १०)**

त्रिकोणी भूखंड श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राने वृक्षारोपण करून केंद्राच्या वापरासाठी मागितलेला आहे.

सदरहु जागेवर बांधकाम करता येणार नाही, तसेच सदर परिसर साफ व स्वच्छ ठेवण्यात यावा तसेच सदरील जागेवर वृक्षारोपण करावे व सदरील वृक्षांची योग्य ती निगा ठेवावी या अटीवर सदरील भूखंड श्री स्वामी सेवा केंद्रास लीजवर देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.प्रकाश अत्तरदे, डॉ.भागवत कराड अनुमोदक :श्री.संजय जोशी,श्री.प्रशांत देसरडा

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-९ एल सेक्टर, हडको औरंगाबाद येथील श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्रा लगतच्या प्लॉट क्र.१११ ए-१ सेक्टर एल मधील ५८ स्के.मीटरचा त्रिकोणी भूखंड श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्रास देणेस व सदरील भूखंडावर सेवा केंद्राने वृक्षारोपण करून सदर परिसर साफ व स्वच्छ ठेवणे, तसेच सदरील जागेवर वृक्षारोपण करावे व सदरील वृक्षांची योग्य ती निगा ठेवावी आणि सदरहु जागेवर सेवा केंद्रास बांधकाम करता येणार नाही या अटीवर सदरील भूखंड श्री.स्वामी सेवा केंद्रास लीजवर देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.